**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १३५ व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन /राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन
- नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी स्थानिक खासदारांना पत्र लिहिण्याचं प्रधानमंत्र्यांचं महिलांना आवाहन
- बिहारचे नवे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे सम्राट चौधरी यांचा उद्या शपथविधी
- अतिरिक्त वजन वाहून नेणाऱ्या वाहनांवर उद्यापासून राष्ट्रीय महामार्गावर वाढीव शुल्क

**आणि**

- छत्तीसगढमधे वेदांत कंपनीच्या वीज प्रकल्पात स्फोट होऊन ९ कामगारांचा मृत्यू, ४० पेक्षा जास्त कामगार जखमी

<><><><><>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती देशभरात साजरी होत आहे. त्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुजरातमधल्या गांधीनगरमध्ये लोकभवन इथं असलेल्या बाबासाहेबांच्या छायाचित्राला पुष्पांजली अर्पण केली. उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे, केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी संसद परिसरातल्या प्रेरणास्थळ इथं बाबासाहेबांच्या पुतळ्याला आदरांजली वाहिली.

मुंबईसह राज्यातही आंबेडकर जयंतीचा उत्साह दिसत आहे. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबईसह राज्याच्या विविध भागातून अनुयायी

सकाळपासूनच चैत्यभूमीवर दाखल होत आहेत. चैत्यभूमीवर आज शासकीय मानवंदना देण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह इतर मान्यवरांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी, बाबासाहेबांच्या योगदानाची आठवण करुन दिली.

**- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - --**

**<><><><><>**

राज्यभरातही मोठ्या उत्साहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन झालं. याचा सविस्तर वृत्तांत ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - - -(१ मिनिटं २ सेकंद)**

*(भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं मूळ गाव असलेल्या **रत्नागिरी** जिल्ह्यातल्या आंबडवे इथं सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्यावतीने आज जयंती साजरी करण्यात आली. पालकमंत्री डॉ. उदय सामंत, राज्यमंत्री योगेश कदम यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्याला आणि अस्थिकलशालाही पुष्पहार अर्पण केला. आंबडवे आंतरराष्ट्रीय दर्जाचं स्मारक उभारण्याचं आश्वासन उदय सामंत यांनी दिली. रत्नागिरी पोलीस दलाच्या बँड पथकानं सलामी देवून राज्यगीताची धून वाजवली.*

***नाशिक**मध्ये आज सामाजिक समता सप्ताहाची आज सांगता झाली. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनने शालिमार इथल्या आंबेडकर स्मारकापासून सुरुवात करून पाथर्डी फाटा इथल्या आंबेडकर स्मारकापर्यंत सायकलयात्रा काढली.*

***बुलढाण्यात** जिल्हा परिषद शाळांमध्ये वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा झाल्या. यावेळी विद्यार्थ्यांना संविधान पुस्तिकेचं वाटप करण्यात आलं.*

***यवतमाळ**मध्ये जयंतीनिमित्त भीमगीतावर फ्लॅश मॉब झाला तसंच ढोल आणि लेझीम पथकाचं सादरीकरण झालं. याशिवाय इतरही जिल्ह्यांमध्ये विविध उपक्रमांनी बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी झाली.)*

**<><><><><>**

देशातल्या सर्व महिलांनी स्थानिक खासदारांना पत्र लिहून नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी प्रोत्साहित करावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पत्राद्वारे केलं आहे. देशातल्या महिला वर्गाला उद्देशून

एक पत्र त्यांनी समाजमाध्यमांवर प्रसारित केलं आहे. १६ एप्रिलपासून संसदेत यावर चर्चा सुरू होणार आहे. २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपासून देशात महिलांसाठी आरक्षण लागू करायचं असेल तर या सुधारणा मंजूर होण्याची गरज आहे, असं त्यांनी या पत्रात नमूद केलं आहे.

या सुधारणा मंजूर झाल्यावर देशात लोकसभेच्या साडे आठशे जागा होतील.

**<><><><><>**

बिहारचे नवे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे नेते सम्राट चौधरी यांचा शपथविधी उद्या सकाळी ११ वाजता होणार आहे. पाटण्यात लोकभवन इथं राज्यपाल सय्यद अता हसनैन त्यांना पदाची शपथ देतील. भाजपाच्या विधीमंडळ नेतेपदी चौधरी यांची एकमतानं निवड झाल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विधीमंडळ नेतेपदी त्यांची निवड झाली. त्यानंतर त्यांनी राज्यपालांकडे जाऊन सरकार स्थापनेचा दावा केला. त्यानंतर ते म्हणाले…

**बाईट - सम्राट चौधरी**

त्याआधी आज नितीश कुमार यांनी मंत्रीमंडळ बरखास्त केलं आणि बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द केला. ते आता राज्यसभेचे सदस्य आहेत. नव्या सरकारला आपलं मार्गदर्शन आणि पाठिंबा कायम राहील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अतिरिक्त वजन वाहून नेणाऱ्या वाहनांवर उद्यापासून राष्ट्रीय महामार्गावर वजनानुसार शुल्क आकारलं जाणार आहे. दहा टक्क्यापेक्षा जास्त आणि ४० टक्क्यापर्यंत अतिरिक्त वजन असलेल्या वाहनांना दुप्पट शुल्क आकारलं जाईल. तर ४० टक्क्यापेक्षा जास्त वजन असलेल्या वाहनांवर चौपट शुल्क आकारलं जाणार आहे. हे शुल्क फास्टॅगद्वारे वसूल केलं जाईल, असं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सांगितलं आहे.

**<><><><>**

छत्तीसगढमधे सिंगीतराई इथं वेदांत कंपनीच्या वीज प्रकल्पात स्फोट होऊन ९ कामगारांचा मृत्यू झाला, तर ४० पेक्षा जास्त कामगार जखमी झाले. जखमींना तातडीनं जवळच्या रुग्णालयात नेलं आहे, त्यांच्यापैकी ८ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. दुर्घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरु आहे.

**<><><><>**

दिल्ली ते डेहराडून प्रवासाचा वेळ अर्ध्यावर आणणाऱ्या इकॉनॉमिक कॉरिडॉरचं उद्घाटन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालं. या कॉरीडॉरमुळे या भागाचा मेठा फायदा होणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं….

**होल्ड- बाईट - प्रधानमंत्री (कॉरीडॉर)**

देहराडूनला पोहोचण्यापूर्वी प्रधानमंत्र्यांनी या कॉरिडॉरच्या वन्यजीवन भागाचं निरीक्षण केलं.

**<><><><>**

राष्ट्रीय सुरक्षेसाठी तंत्रज्ञानस्नेही आणि कुशल मनुष्यबळाची गरज असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या आज गुजरातमधे गांधीनगर इथं राष्ट्रीय रक्षा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात बोलत होत्या.

यावेळी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना देशासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रपतींनी मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या नागपूर दौऱ्यावर आहेत. नागपूरच्या एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या दुसऱ्या दीक्षान्त समारंभासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून त्यात उपस्थित राहतील. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं भारतीय

महसूल सेवेच्या ७८ व्या तुकडीच्या प्रशिक्षण समापन समारंभ त्यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

<><><><><>

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या संदर्भातला न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल राज्य सरकारनं जाहीर करावा अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. या समितीनं कशाप्रकारे विभाजन केलं आहे हे तपासू द्यावं, अशी विनंती त्यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. आरक्षणात वर्गीकरण करण्याचा अधिकार संसदेचा आहे. पण सर्वोच्च न्यायालयानं तो अधिकार घेतला आणि राज्य सरकारला उपवर्गीकरण करायला सांगितलं, याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ भाजपा नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधल्या भाजपा कार्यकर्त्यांशी नमो ॲपद्वारे संवाद साधला. भाजपाच्या जाहिरनाम्याला बंगालचे लोग मोठ्या प्रमाणात पसंत करत आहेत, या निवडणुकीत कार्यकर्त्यांचा उत्साह, ऊर्जा उल्लेखनीय आहे असं मोदी म्हणाले. राज्यातले सर्व स्तरातले नागरिक भाजपाच्या कार्यक्रमात सहभागी होत आहेत असंही ते म्हणाले.

//<><><><><>//